# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/08/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. बुट्टीबोरी** – दिनांक ०९/०८/२०२३ चे ०६.०० वा. ते दिनांक १०/०८/२०२३ च १६.०० वा. सुमारास पो.स्टे. बुट्टीबोरी हद्दीत फिर्यादी यांचा मुलगा वय १७ वर्ष हा दिनांक ०९/०८/२०२३ रोजी पायदळ दत्तामेघे कॉलेज बुट्टीबोरी येथे गेला होता. परंतु मुलगा कॉलेज मधुन घरी परत आला नाही. फिर्यादीला असे वाटले कि मुलगा मित्राकडे गेला असावा. दिनांक १०/०८/२०२३ रोजी फिर्यादी कामावरून घरी परत आले तेव्हा मुलगा हा घरी न आल्याने फिर्यादीचा मुलगा याला कोणीतरी अज्ञात ईसमाने आमीश दाखवुन पळवुन घेवुन गेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठाकुर मो. नं. ८८८८८६२२५७ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत १४ कि.मी अंतरावरील मौजा सिल्लोरी येथे दिनांक १६/०४/२०२३ चे १२.०० वा. ते दिनांक २३/०६/२०२३ चे २०.०० वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपी याने मनी एम्पायर नावाचे कंपनीतुन विधी शर्मा नावाचे व्यक्ती बोलत असल्याचे सांगुन फिर्यादी नामे– अमर विष्णु गौरखेडे, वय २५ वर्ष, रा. सिल्लोरी पोस्ट आदासा ता. सावनेर यांना शेअर ट्रेडींग करून तुम्हाला प्रॉफीट करून देतो असे सांगुन फिर्यादी यांचा विश्वास जिंकुन अज्ञात आरोपीने एच. डी. एफ. सी. बॅंकेचे अकाउंट नंबर हे मनी एम्पायर कंपनीचे असल्याने सांगुन त्यामध्ये वेळोवेळी विवीध कारणे सांगुन पे. टी. एम व फोन पे ॲप द्वारे ऑनलाईन पैसे मागवून फिर्यादी यांची एकुण ५२७०००/– रूपयाची फसवणुक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६ ड माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अतुल खोडनकर मो. नं. ९१५८९७३७५० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**